# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

## पुणे मेट्रोला मानाचा 'मोबिलिटी अवॉर्ड' प्रदान




पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या आणि औद्योगिक विकासाला गती देणाऱ्या पुणे मेट्रोच्या कार्याची दखल घेत, यावर्षीचा मानाचा 'मोबिलिटी अवॉर्ड' पुणे मेट्रोला प्रदान करण्यात आला आहे. सप्लाय चेन (पुरवठा साखळी) व्यवस्थापनात मोबिलिटी हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो, याच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हा सन्मान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्याला पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर आणि कार्यकारी संचालक श्री. गौतम बिन्हाडे उपस्थित होते.

याप्रसंगी पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना श्री. श्रावण हर्डीकर यांनी मेट्रो प्रकल्पाच्या यशात पुरवठा साखळीच्या (Supply Chain) भूमिकेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "पुण्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासासाठी मेट्रोचे जाळे विस्तारणे ही काळाची गरज आहे. मेट्रो प्रकल्प उभे राहत असताना सध्या पुणेकरांना काही प्रमाणात वाहतुकीचा त्रास सहन करावा लागत आहे, मात्र हा आजचा त्रास उद्याच्या सुखकर आणि गतिमान भविष्याची गुंतवणूक आहे."

**पारदर्शकता आणि अचूक निर्णयक्षमता**

प्रशासकीय कामकाजावर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, "मेट्रोसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्ये काम करताना गतिमान आणि अचूक निर्णय घेणे अनिवार्य असते. कोणताही करार (Contract) करताना तो जनतेचा पैसा आहे याचे भान राखून, त्याचा योग्य आणि पारदर्शक वापर होईल यालाच आमचे प्राधान्य असते."

श्री. हर्डीकर यांनी या पुरस्काराचे श्रेय आपल्या पुरवठादारांना दिले. ते म्हणाले, "गुणवत्ता आणि वेग यांचा समतोल राखून मेट्रोचे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आमची 'सप्लाय चेन' अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आज मिळालेला हा पुरस्कार म्हणजे आमच्या सर्व पुरवठादारांच्या कष्टाचा आणि गुणवत्तेचा सन्मान आहे. या गौरवबद्दल आम्ही IIMM (Indian Institute of Materials Management) चे ऋणी आहोत."

पुणे शहरात मेट्रोचे जाळे येत्या काळात अधिक विस्तारणार असून, यामुळे शहरातील वाहतूक कोंडी सुटण्यास आणि उद्योगांना हक्काची कनेक्टिव्हिटी मिळण्यास मोठी मदत होणार आहे.